# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date: 17 May 2024

# Time: 01.00 to 01.05 PM

# Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १७ मे २०२४ दुपारी १.०० वा.

****

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी येत्या २० मे रोजी मतदान होणार आहे. या टप्प्यात राज्यातल्या धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे आणि मुंबईतल्या सहा मतदारसंघांचा समावेश आहे. या सर्व मतदारसंघात प्रचार उद्या संपत असून, सर्वच राजकीय पक्षांचे नेते सभा, बैठका, पदयात्रा काढून जोरदार प्रचार करत आहेत.

भाजप नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी मुंबईत शिवाजी पार्कवर प्रचार सभा घेणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे या सभेला उपस्थित राहणार आहेत.

तर वांद्रे कुर्ला संकुलात विरोधकांच्या इंडिया आघाडीची देखील आज सभा होणार आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि आम आदमी पक्षाचे अध्यक्ष दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल या सभेला उपस्थित राहणार आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाणे लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्राचारार्थ निघालेल्या दुचाकी रॅलीत सहभाग घएतला.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची धुळे जिल्ह्यात शिंदखेडा इथं, आणि संध्याकाळी नाशिक इथं सभा होणार आहे.

तर महाविकास आघाडीतर्फे खासदार अमोल कोल्हे यांची धुळ्यात, आणि आदित्य ठाकरे यांची सभा नाशिकमध्ये सभा आयोजित करण्यात आली आहे.

****

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अखेरच्या टप्प्यात अर्ज मागे घेण्याची मुदत आज संपत आहे. या टप्प्यात सात राज्य आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या ५७ लोकसभा मतदारसंघात येत्या एक जून रोजी मतदान होणार आहे.

****

भारतभेटीवर आलेले त्रिनिदाद आणि टोबॅगोचे पंतप्रधान डॉ. किथ ख्रिस्टोफर राऊली आणि त्यांच्या पत्नी शेरॉन राऊली यांचं राज्यपाल रमेश बैस यांनी काल मुंबईत औपचारिक स्वागत केलं. त्रिनिदाद टोबॅगोने भारतीय स्वातंत्र्य लढ्यातून प्रेरणा घेतली असं सांगून, भारतीय उद्योजकांनी त्रिनिदाद टोबॅगोच्या विकासात सहभागी व्हावं, असं आवाहन डॉ किथ राऊली यांनी यावेळी केलं. त्रिनिदाद इथं क्रिकेट अकादमी स्थापन करण्याच्या दृष्टीने या भेटीत उद्योजकांशी चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं.

****

उत्तर - पूर्व मुंबई लोकसभा मतदारसंघात १७३ ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांनी गृह मतदानाचा हक्क बजावला आहे. यामध्ये ८५ वर्षांवरील १५६, तर २८ दिव्यांग मतदारांचा समावेश आहे.

धुळे लोकसभा मतदारसंघात अत्यावश्यक सेवेत कार्यरत असलेल्या ८९५ कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतदान करून घेण्यात आलं.

****

लातूर इथल्या शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन इथं येत्या चार जून रोजी लोकसभा निवडणुकीची मतमोजणी होणार असून, यासाठी विविध पथकं गठीत करण्यात आली आहेत. प्रत्येक पथकातल्या अधिकारी, कर्मचार्यांनी आपली जबाबदारी अचूकपणे पार पाडावी, अशी सूचना जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिली आहे.

****

राज्यात अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे सुमारे साडेपाच हजार हेक्टरवरील शेती आणि फळपिकांचं नुकसान झालं, तसंच १९ जिल्ह्यातल्या उन्हाळी पिकं आणि फळबागांना फटका बसला आहे. गोंदिया, भंडारा, नाशिक जिल्हयात सर्वाधिक नुकसान झालं असल्याचं कृषी विभागाच्या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. अवकाळी पाऊस अजूनही सुरूच असल्यामुळे नुकसानीचा आकडा वाढण्याचा अंदाज कृषी विभागानं व्यक्त केला आहे.

****

राज्यात खरीप हंगामासाठी पुरेसा खतांचा साठा उपलब्ध असून, कृषी विभागानं यंदा ४४ लाख ५६ हजार टन रासायनिक खतांचा साठा मंजूर केला आहे. मे महिन्याच्या सुरुवातीपर्यंत राज्यात २९ लाख १९ हजार टन खतांचा साठा होता. उर्वरित खतांचा पुरवठा केंद्राकडून होणार आहे. खतांच्या विक्रीमध्ये काळाबाजार किंवा अन्य गैरप्रकार होत असल्याचं आढळल्यास संपर्क साधण्याचं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

****

लातूर जिल्ह्यात चाकूर तालुक्यातल्या शिवणी, शिवणखेड गावाच्या शिवारात बिबट्याचा वावर आढळून आला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून या ठिकाणी प्रशासनानं वन विभागाच्या मदतीने वन कर्मचारी तैनात केले आहेत. त्यामुळे या गावातल्या तसंच परिसरातल्या ग्रामस्थांनी सतर्क राहण्याचं आवाहन, सहायक वनसंरक्षक वैशाली तांबे यांनी केलं आहे.

****

कझाकिस्तानमध्ये अस्ताना इथं सुरु असलेल्या एलोर्डा चषक मुष्टीयुद्धा स्पर्धेत महिलांच्या ५२ किलो वजनी गटात विद्यमान विश्वविजेत्या निखत झरीननं कझाकिस्तानच्या खेळाडुवर पाच – शून्य असा विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. ४८ किलो वजनी गटात मीनाक्षीनं, ५० किलो वजनी गटात अनामिकानं, तर ६० किलो वजनी गटात मनीषा यांनीही अंतिम फेरीत प्रवेश केला.

****

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सहभागी होणार्या सहा सदस्यीय भारतीय टेबल टेनिस संघानं नेतृत्व अव्वल टेबल टेनिसपटू मनिका बत्रा आणि शरथ कमल करणार आहेत. भारतीय टेबल टेनिस महासंघानं काल या संघाची घोषणा केली.

****